महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १३८ वा | दिनांक : २३/०२/२०२५ | वार : रविवार

## असली राष्ट्रवादी कोणती हे जनतेने दाखवून दिले : अमित शहा



**पुणे :** महाराष्ट्राच्या जनतेला धन्यवाद करण्यासाठी मी आज पुण्यात आलो असल्याचे केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी म्हटले आहे. विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील जनतेने महायुतीला आशीर्वाद दिला. भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेतृत्वातील सरकार येथे स्थापन केले आहे. महायुतीला ऐतिहासिक बहुमत तर महाराष्ट्राच्या जनतेने दिलेच आहे मात्र, त्याच बरोबर कोणती शिवसेना असली आणि कोणती शिवसेना नकली तसेच कोणती एनसीपी असली आणि कोणती नकली, याचा निर्णय देखील महाराष्ट्रातील जनतेने केला असल्याचा दावा अमित शहा यांनी केला आहे.

दिल्लीमध्ये होणाऱ्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या निमित्ताने कालच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि शरद पवार हे एकाच व्यासपीठावर आले होते. यावेळी या दोन्ही नेत्यांमध्ये असलेली जवळीक सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. मात्र, आज अमित शहा यांनी पुन्हा एकदा शरद पवार यांच्यावर निशाणा साधला आहे. खरी एनसीपी कोणाची हे आता महाराष्ट्राच्या जनतेने दाखवून दिले असल्याचे अमित शहा यांनी म्हटले आहे.

पुण्यात केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शहा यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत 'प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा २ अंतर्गत लाभार्थींना मंजूरी पत्र व पहिल्या हप्त्याच्या वितरण कार्यक्रमा'त ते बोलत होते.

या वेळी अमित शहा म्हणाले की, २० लाख कुटुंबीयांना घर देताना त्या सर्व कुटुंबीयांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या वतीने मी अभिवादन तसेच अभिनंदन करतो. देशाच्या प्रगतीत विकासाचा पाया रचत असताना या सर्व कुटुंबांनी कामाला लागण्याचा संकल्प शहा यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्रातील जनतेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनवले आहे. पंतप्रधान झाल्यानंतर पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत मोदीजींनी प्रधानमंत्री आवास योजनेच्या टप्प्या दोनची सुरुवात केली आहे. देशभरात सर्वात जास्त घरे ही महाराष्ट्राला मिळाली असल्याचा दावा अमित शहा यांनी केला आहे. याचा आम्हाला सर्वांना आनंद आणि गौरव असायला हवा, असे देखील ते म्हणाले. घराचा अर्थ केवळ चार भिंती नाही तर विकासाच्या स्वप्नाला साकार करणे असल्याचे त्यांनी म्हटले आहे. प्रत्येकाचे घर हे स्वर्गा सारखे तर असतेच मात्र येणाऱ्या पिढीसाठी हा विकासाचा प्रथम टप्पा देखील असतो. गरिबांना घरासोबतच शौचालय देणे म्हणजे त्यांच्या सन्मानाची आणि स्वाभिमानीची रक्षा मोदीजींनी केली असल्याचे शहा यांनी म्हटले आहे.

प्रत्येकाला घर या योजनेअंतर्गत महिला, मागासवर्गीय, एसटी, एससी, गरीब समाजाला स्वतःचे घर देण्याचा कार्यक्रम तयार करण्यात आला. २०२९ पर्यंत यात पाच कोटी घरे दिली जाणार आहेत. त्यातील तीन कोटी ५० लाख नागरिकांना आतापर्यंत घरे देण्यात आली आहेत. तर महाराष्ट्रात देखील आतापर्यंत तेरा लाख पन्नास हजार घरे देण्यात आली आहेत. आता १९ लाख ५० हजार घरे देण्यात येत आहेत. ही सर्व घरे वेळेत पूर्ण करण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निश्चित केले असल्याचे म्हणत अमित शहा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्याचे देखील कौतुक केले.

## भटकती आत्म्याच्या बाजूला पीएमओने कसे बसू दिले? संजय राऊत



**मुंबई :** शरद पवार हे मोदींपेक्षाही सिनियर आहेत. सत्तेच्या पदावर कोणी बसला म्हणजे तो ज्येष्ठ आणि श्रेष्ठ होत नाही. साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष हे शरद पवार आहेत. वास्तविक मोदी शरद पवार यांच्या बाजूला बसणार नाहीत असे मला वाटले होते. कारण भटकती आत्म्याच्या बाजूला पीएमओने त्यांना कसे बसू दिले? असा प्रश्न उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी उपस्थित केला. मोदींनी शरद पवार यांना दिलेला मान-सन्मान हा केवळ ढोंगीपणा असल्याचेही ते म्हणाले. त्यांचे केवळ 'देखिल्या देवाला दंडवत' असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. ते प्रसार माध्यमांशी बोलत होते.

दिल्लीतील अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या उद्‌घाटन कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि शरद पवार एकमेकांच्या बाजूला बसले होते. त्यांच्यात बराच वेळ चर्चा देखील रंगली होती. तर नरेंद्र मोदी शरद पवारांची काळजी घेताना देखील दिसून आले. या सर्वांची चर्चा सुरु असताना संजय राऊत यांनी मोदींवर निशाणा साधला आहे. नरेंद्र मोदी शरद पवार यांना भटकती आत्मा म्हणाले होते. त्यावरुन त्यांच्या बाजूला मोदी कसे बसले? असा प्रश्न राऊत यांनी उपस्थित केला आहे. नरेंद्र मोदी यांना शरद पवार यांना दिलेला आदर आणि मान-सन्मान हा व्यापार आणि ढोंग असल्याचे ते म्हणाले. हे केवळ तेवढ्यापुरते मर्यादीत होते असा आरोपही त्यांनी केला आहे.

नरेंद्र मोदी आपल्या भाषणात बाळासाहेब ठाकरे यांच्या विषयी मनात आदर आणि मानसन्मान असल्याचे सांगतात. मात्र, बाळासाहेब ठाकरे यांची निर्मिती असलेली शिवसेना देखील मोदींनीच फोडली, शरद पवार यांचा कष्टांतून उभा केलेला पक्ष मोदींनीच फोडला, असा आरोप देखील राऊत यांनी केला आहे. त्यामुळे देखिल्या देवाला दंडवत अशी मराठीत म्हण आहे. हा तसलाच प्रकार असल्याचा दावा राऊत यांनी केला आहे.

नरेंद्र मोदी यांचे उजवे हात असलेले अमित शहा महाराष्ट्रात येऊन शरद पवार यांचे देशासाठी आणि महाराष्ट्रासाठी योगदान काय? असा प्रश्न विचारतात. तसेच या काका आणि पुतण्यांनी महाराष्ट्र लुटला असेही नरेंद्र मोदी यांनी म्हटले होते. आता त्यातला पुतण्या हा त्यांच्याच पक्षांमध्ये आहे. तर काकांसाठी स्वत: मोदी खुर्ची ओढत होते, याला आम्ही ढोंग म्हणतो, असे देखील राऊत यांनी म्हटले आहे. त्यांच्याविषयी खरा आदर असतो तिथे राजकारण होत नाही. साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर दोन पाच मिनिटांसाठी का होईना, व्यापार झाला. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये त्याला फार गांभीर्याने घेण्याची आवश्यकता नसल्याचे राऊत यांनी म्हटले आहे.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २३ फेब्रुवारी २०२५


## विद्यार्थ्यांनी स्वत:तील बलस्थाने ओळखायला शिकले पाहिजे : प्रा.बी. वाय. कुलकर्णी




***जालना (प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे) :** येथील जे. ई. एस.महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर आणि मराठी विभाग जे. ई.एस. महाविद्यालय, जालना. यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी व्याख्यानमाला घेण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री हे होते. तर प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ विचारवंत आणि सेवानिवृत्त राज्यशास्त्र विभाग प्रमुख जे.ई. एस. महाविद्यालय, जालना. येथील प्रा. बी. वाय. कुलकर्णी तर दुसरे वक्ते म्हणून प्रा. बाबासाहेब खंडाळे हे उपस्थित होते.

त्याचबरोबर व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. महावीर सदावर्ते, पर्यवेक्षिका करुणा वासनिक, ग्रंथपाल मनीषा सुतार आदी उपस्थित होते. या व्याख्यानमालेत प्रमुख वक्ते म्हणून बोलत असताना ज्येष्ठ विचारवंत प्रा.बी.वाय. कुलकर्णी म्हणाले विद्यार्थ्यांनी आपल्यातील बलस्थान ओळखायला शिकले पाहिजे ज्या कामात आवड असेल ते काम आवडीने केले पाहिजे. त्यातूनच यश प्राप्त होऊ शकते, असे सांगून ते पुढे म्हणाले प्रसिद्ध क्रिकेट खेळाडू भारतरत्न सचिन तेंडुलकर व प्रसिद्ध अभिनेता अमिताभ बच्चन यांनी आपल्या आवडीचे क्षेत्र निवडून त्यात कमालीचे यश प्राप्त केले.

कार्यक्रमाचे दुसरे वक्ते प्रा. बाबासाहेब खंडाळे यांनी गांधी विचार व त्यांचे साहित्य हे मानवी समाजास दिशादर्शक ठरतील असे सांगून, गांधीजी वाचण्यासोबत जगणे हे आवश्यक आहे,असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री अध्यक्षीय भाषण करताना म्हणाले विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी व त्यांचे विचार समजून घ्यावे. त्यात महात्मा गांधींचे 'माझे सत्याचे प्रयोग' हे पुस्तक वाचून त्यातील विचार आचरणात आणावेत. असे सांगून विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामध्ये येऊन स्वतःचा सर्वांगीण विकास घडवावा, असेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. यशवंत सोनुने यांनी केले याप्रसंगी ते म्हणाले सद्यस्थितीतील महात्मा गांधी यांच्या विचाराचे महत्त्व सांगून ते पुढे म्हणाले की, महात्मा गांधी यांच्या विचारातून भारतीय समाजा समोरील निर्माण झालेले अनेक प्रश्न सहज सुटू शकतील. या कार्यक्रमाला मराठी विभागाचे प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे, प्रा.डॉ.नानासाहेब गोरे, डॉ. नागनाथ शेवाळे, डॉ.एफ.एम.मोहिते तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. बी.जी. श्रीरामे यांनी केले तर आभार प्रा. उद्धव बिनीवाले यांनी मानले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. गजानन देशमुख, प्रा. लहाडे, डॉ. विश्वजीत डोईफोडे, प्रा.राम लहाने त्याचबरोबर महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांनी विशेष प्रयत्न केले.

## नांदेड येथील "डॉ. राहुल गणपतराव सोनकांबळे यांना पीएचडी बहाल"



**नांदेड :** डॉ. राहुल गणपतराव सोनकांबळे यांनी सिंबायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी, लवळे, पुणे येथून आपली पीएचडी यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. त्यांचा संशोधन प्रबंध "इलेक्ट्रॉनिक हेल्थ रेकॉर्ड्सच्या संचयन व देवाणघेवीसाठी गोपनीयता जपणारी इंटरऑपरेबल ब्लॉकचेन प्रणाली" या विषयावर असून, डॉ. अनुपकुमार एम. बोंगाले (सिंबायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी, लवळे, पुणे). यांच्या मार्गदर्शनाखाली हा संशोधन प्रबंध पूर्ण झाला आहे.तसेच डॉ. श्रद्धा फणसलकर (MIT ADT विद्यापीठ पुणे) यांनी सुद्धा ब्लॉक चेन विषयी मार्गदर्शन केले.डॉ. सोनकांबळे यांनी ब्लॉकचेन तंत्रज्ञानाच्या मदतीने हेल्थकेअर डेटा सुरक्षित व गोपनीय कसा ठेवता येईल, यावर संशोधन केले आहे. त्यांचे संशोधन आरोग्य व्यवस्थेमधील डेटा सुरक्षा आणि गोपनीयता सुनिश्चित करण्यास मदत करेल.

त्यांनी केलेल्या संशोधनावर आधारित IEEE Access, MDPI आणि Methods X या SCIE-इंडेक्सड आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये तीन महत्त्वपूर्ण संशोधनपत्रे प्रकाशित झाली आहेत. त्यांच्या संशोधनाला उत्कृष्ट प्रतिसाद आणि मोठ्या प्रमाणावर संदर्भ (सिटेशन्स) मिळाले आहेत, यामुळे त्यांच्या कार्याची जागतिक स्तरावर नोंद घेतली जात आहे.

त्यांच्या संशोधनाची दखल घेत कर्टिन युनिव्हर्सिटी, पर्थ (ऑस्ट्रेलिया) येथील ब्लॉकचेन R&D लॅबने त्यांना संशोधन निधी प्रदान केला आहे, ज्यामुळे त्यांचे कार्य आणखी दृढ झाले आहे.डॉ. राहुल गणपतराव सोनकांबळे यांच्या ब्लॉकचेन आधारित हेल्थकेअर सोल्युशन्स मधील योगदानामुळे भविष्यात डेटा एक्सचेंज व गोपनीयता व्यवस्थापनात मोठी सुधारणा होण्याची शक्यता आहे. डॉ. राहुल सोनकांबळे हे अत्यंत मेहनती, निष्ठावंत,समाजाप्रती जाणीव असलेलं व्यक्तिमत्त्व होय.

यशस्वी यशाबद्दल डॉ. स्वाती रोहित देशमुख सौ. सुनीता गणपतराव सोनकांबळे (आई वडील) निवृत्त व्यवस्थापक एस. बी.आय बँक नांदेड. सौ. सुनंदा रामराव सोनकांबळे(काका, काकू). गंगासागर मोतीराम कार्ले.(मामा, मामी) सौ.जयश्री राहुल सोनकांबळे (पत्नी), इंजि.सौ.वनिता प्रा .डॉ .दिलीप रावणगाँवकर. सौ.विद्या प्रा.चंद्रमुनी भद्रे . वर्षा सोनकांबळे. इंजि. बुद्धभूषण सोनकांबळे. सौ.सोनल आकाश जाधव. राजरत्न सोनकांबळे. तनुजा अनुजा. चैत्रा.अद्विक, आराध्या.विकास जाधव. ,यांनी आभिनंदन केले. आणि पुढील भावी वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.

## निधन वार्ता



**दौलताबाद (शिवाजी गायकवाड):** शेख रशीद शेख हुसेन वय (७८) वर्ष राहणार छत्रपती संभाजी नगर शरीफ कॉलोनी शासकीय रुग्णालय सेवा निवृत्त कर्मचारी यांचे अल्प आजाराने दि २० फेब्रुवारी गुरुवारी निधन झाले आहे.

त्यांचे दफनविधी अराफत मशीद किराडपुरा येथे करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली ,सुना नातवंडे असा परिवार आहे

## कर्मवीर आ.मा.पाटील महाविद्यालयात संविधान गौरव महोत्सव निमित्त व्याख्यान संपन्न ..!




भारतीय संविधान हे सर्वश्रेष्ठ आहे ... प्रा.डॉ.के.एन.वसावे

**पिंपळनेर :** कायदा म्हणजे नियमावली. या कायद्याच्या नियमावलीनुसारच देशाची शासन व्यवस्था चालते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान लिहून सुपूर्त केले. ते संविधान २६ जानेवारी १९५० पासून लागू करण्यात आले. भारतीय संविधान हे जगात मोठे आहे. असे मत राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ.के.एन.वसावे यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष पिंएसोचे सचिव ए.एस. बिरारीस होते. विचार मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.बी.पवार,प्रा. डॉ. सतीश मस्के, प्रा. डॉ. के.एन.वसावे,बी.के. विजया भामरे, बी.के.छाया गांगुर्डे आदी उपस्थित होते.कर्मवीर आ.मा.पाटील वरिष्ठ महाविद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार भारतीय राज्यघटनेच्या 75 वर्षपुर्ती निमित्त संविधान गौरव महोत्सव अंतर्गत प्रा. डॉ. के.एन.वसावे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. पुढे बोलताना डॉ. वसावे म्हणाले की, भारतात जी विविधता आढळते ती कुठेच दिसत नाही. याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे भारतीय संविधान हे होय. इतर देशाच्या तुलनेमध्ये भारतीय संविधान हे सर्वश्रेष्ठ आहे. संविधानाची सुरुवातच आम्ही भारताचे लोक इथून सुरुवात होते.

त्यामुळे रयतेला सर्व सन्मान देण्यात आला आहे. या संविधानानुसार भारतातील सर्व जाती धर्मातील लोकांना सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक व इतर क्षेत्रातील न्याय मिळाला जातो. स्वातंत्र्य,समता,बंधुता व न्याय हे मूल्य संविधानाने दिली त्यामुळेच या देशातील सर्व नागरिक विकास करू शकले. त्याचबरोबर हक्क आणि कर्तव्याबाबत प्रत्येकाने जागरूक राहिले पाहिजे. अध्यक्षीय समारोप करताना ए.एस. बिरारीस म्हणाले की, संविधानात हक्क आणि कर्तव्य दिली आहेत.

हक्का बरोबर कर्तव्याची ही जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे.आपण व आपले शासन नियमानुसारच चालले पाहिजे. संविधान ही एक नियमावली आहे. कर्तव्याचे पालन केले पाहिजे. प्रत्येकानी जाणीव ठेवायला पाहिजे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.बी.पवार म्हणाले की, संविधान हे सर्वोच्च आहे. त्यानुसार प्रत्येकानी आपल्या जीवनात तसे आचरण केले तर जीवन समृद्ध होते. त्याचबरोबर संविधानाचा अर्थ सांगून संविधानाविषयी विद्यार्थ्यांच्या मनामध्ये जागृती निर्माण होणे ही काळाची गरज आहे. भारतीय संविधानाच्या 75 वर्ष पूर्ती निमित्त महाविद्यालयात वक्तृत्व ,वादविवाद व निबंध स्पर्धेचे ही आयोजन करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाचे समन्वयक व मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. सतीश मस्के यांनी केले.आभार प्रा. डॉ.एन.बी.सोनवणे यांनी मानले.

कार्यक्रमाला प्रा. उगलमुगले,प्रा.बळसाने, प्रा.गवळी,प्रा.तोरवणे,प्रा.सोनवणे, डॉ.खरात, प्रा.घरटे,प्रा.बागुल,प्रा.सुभालकर आदी उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात भारतीय राज्यघटनेच्या प्रास्ताविकेच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमासाठी कैलास जिरे, सुनील पवार, रवी शेलार व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २३ फेब्रुवारी २०२५


## देश विरोधातील शक्तींना बाजूला सारण्यासाठी युवकांना पुढाकार घ्यावा लागेल, उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचे आवाहन



**छत्रपती संभाजीनगर** : वेगाने विकास होत असलेला आपला भारत देश विकासाच्या अमर्याद संधी असलेला देश आहे. या संधी युवक युवतींनी ओळखाव्या व आपल्या व देशाच्या प्रगतीत योगदान द्यावे,असे आवाहन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केले. धनखड यांच्या प्रमुख उपस्थित डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६५ वा दीक्षांत समारंभ संपन्न झाला.

उपराष्ट्रपती धनखड म्हणाले की, गेल्या दशकात देशाने तंत्रज्ञान क्षेत्रात आणि आर्थिक क्षेत्रात प्रगती केली आहे. आपण जगातील पाचवी अर्थव्यवस्था झालो असून तिसरी अर्थव्यवस्था होण्याच्या मार्गावर आहोत. देशात प्रचंड क्षमता असून आता आपण विकासाच्या मार्गावर वेगाने पुढे जात आहोत. पायाभूत सुविधा, दळणवळण, इंटरनेट सुविधा, तंत्रज्ञानाचा उपयोग विविध क्षेत्रात करुन आपण पुढे जात आहोत. जगाच्या एकूण व्यवहारापैकी 15 टक्के आर्थिक व्यवहार आपल्या देशात होत आहेत. आपल्या देशात उपलब्ध असलेल्या विकासाच्या संधी जोपर्यंत देशातील युवकांना लक्षात येत नाही तोपर्यंत वेगाने पुढे जाता येत नाही. युवकांसमोर अमर्याद संधी आहेत. ग्रामीण भागातून, लहान शहरातून स्टार्ट अप पुढे येत आहेत. सागरी तंत्रज्ञान ते अंतरीक्ष तंत्रज्ञानापर्यंत विविध क्षेत्रात संधी आहेत. विकसित भारत हे आपले स्वप्न असून त्या दिशेने आपली वाटचाल सुरू आहे. नव्या संधींचा उपयोग करीत देशाच्या विकासाचे नेतृत्व युवकांनी स्वीकारणे आवश्यक आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विद्यापीठाला असलेले नाव आणि छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव शहराला असल्याने इथे भेट देणे विशेष असल्याचे नमूद करून उपराष्ट्रपती धनखड म्हणाले की, वैयक्तिक प्रयत्न, पालक आणि प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाने स्नातकांना यश मिळाले आहे. दीक्षांत समारंभ म्हणजे शिक्षणाचा अंत नव्हे. शिक्षण हे आयुष्यभर सुरुच राहणार आहे, हे लक्षात ठेवून जीवनात सातत्याने ज्ञान प्राप्त करायचा प्रयत्न करावा. विद्यापीठाचे विद्यार्थी म्हणून विद्यापीठाच्या विकासात योगदान द्यावे. या महान विद्यापीठाच्या उत्कर्षासाठी प्रत्येक माजी विद्यार्थ्याने या प्रक्रियेत आपले योगदान देणे गरजेचे आहे.

राष्ट्र प्रथम हा विचार करून दरडोई उत्पन्न वाढविण्यासाठी आपल्याला वेगाने आणि निश्चयाने पुढे जावे लागेल. सामाजिक सहचर्य, विविधतेत एकता, सांस्कृतिक मूल्यांची जपणूक, ज्येष्ठांचा सन्मान, पर्यावरण रक्षण या मुल्यांचा अंगिकार करुन आपण प्रगती करु शकतो. स्वदेशी, भारतीयत्वाचा अभिमान आणि सर्मपित भावनेद्वारे देशाला सर्वोच्च स्थानावर पोहोचविता येईल. देश विरोधातील शक्तींना बाजूला सारून हे साध्य करता येईल, यासाठी युवकांना पुढाकार घ्यावा लागेल.

देशाला अस्थिर करणाऱ्या बाबींपासून आपल्याला सजग राहावे लागेल. भारतात प्रगतीच्या अनेक संधी असल्याने जगाचे लक्ष आपल्याकडे आहे. विद्यापीठाने या संधी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवाव्यात जेणेकरून त्यांच्या प्रयत्नांना पंख फुटतील आणि ते यश संपादन करू शकतील. प्रत्येक युवक-युवतीने आपल्या क्षमता ओळखून या संधींचा उपयोग करून यशस्वी व्हावे. आपल्या पालकांना आनंदाचे क्षण द्यावे. जीवनातील अपयश तात्पुरते असते, आपल्या सातत्यपूर्ण प्रयत्नाने त्यावर मात करता येईल, अशा शब्दात उपराष्ट्रपत धनखड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.






# शाहरुख खान, अजय देवगण, टायगर श्रॉफ यांना समन्स बजावले



**कोटा** : बॉलीवूड स्टार शाहरुख खान, अजय देवगण, टायगर श्रॉफ आणि विमल पान मसालाच्या निर्मात्यांना कोटा ग्राहक न्यायालयात समन्स बजावण्यात आले आहे.

कोटा येथील एका सामाजिक कार्यकर्त्याने जिल्हा ग्राहक वाद निवारण आयोगाकडे या सर्वांविरुद्ध तक्रार दाखल केली आहे आणि पान मसाल्याच्या जाहिरातीवर बंदी घालण्याची मागणी केली आहे. आयोगाने यावर एक सूचना जारी केली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी २१ एप्रिल रोजी होईल.

ही याचिका १३ नोव्हेंबर २०२४ रोजी सामाजिक कार्यकर्ते आणि भाजप नेते इंद्रमोहन सिंग हनी (अॅडव्होकेट) यांनी ग्राहक संरक्षण कायद्याच्या कलम ८९ अंतर्गत दाखल केली होती.

याचिकेत असे म्हटले होते की, केशरचा बाजारभाव प्रति किलो सुमारे ४ लाख रुपये आहे. अशा परिस्थितीत, विमल पान मसाल्यात इतक्या कमी दरात (५ रुपयांचे पाउच) केशर असल्याची दिशाभूल करणारी जाहिरात केली जाते.

विमल पान मसाला यांनी या संदर्भात कोणतेही ठोस पुरावे दिलेले नाहीत. इतर इशारे इतक्या लहान मजकुरात आहेत की ते वाचणे अशक्य आहे.

याचिकाकर्त्याने दिशाभूल करणाऱ्या जाहिरातीवर तात्काळ बंदी घालण्याची मागणी केली आहे. याशिवाय त्यांच्यावर दंड आकारण्याची मागणीही करण्यात आली आहे. दंडाची रक्कम भारत सरकारच्या युवा मंत्रालयातील युवा कल्याण निधीमध्ये जमा करण्याची विनंती करण्यात आली आहे.

या तक्रारीवरून आयोगाचे अध्यक्ष अनुराग गौतम आणि सदस्य वीरेंद्र सिंग रावत यांनी २१ फेब्रुवारी २०२५ रोजी शाहरुख, अजय, टायगर आणि विमल पान मसाला उत्पादकांना नोटीस बजावली आहे आणि त्यांना ग्राहक न्यायालयात बोलावले आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २३ फेब्रुवारी २०२५

# छत्रपती संभाजीनगरमध्ये साहित्य संमेलनाला दणक्यात सुरुवात, म्हणाले-दिल्लीवाले आम्हाला घाबरून पळाले

**छत्रपती संभाजीनगर :** नवी दिल्ली येथे पार पडणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर समांतर, पण वेगळे असे विद्रोही साहित्य संमेलन छत्रपती संभाजीनगरमध्ये होत आहे. सांस्कृतिक विचारयात्रेने १९ व्या अखिल भारतीय विद्रोही मराठी साहित्य संमेलनाला आज सकाळी १० वाजता सुरुवात झाली.

१९वे अखिल भारतीय विद्रोही मराठी साहित्य संमेलन शहरात आमखास मैदानावरील मलिकअंबर नगरीत २१, २२ व २३ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आले आहे. यात परिसंवाद, कविसंमेलने, व्याख्यान, गटचर्चा यांची रेलचेल असलेल्या संमेलनात दहा हजारांपेक्षा अधिक रसिक सहभागी होतील, असा विश्वास संयोजकांनी व्यक्त केला. शुक्रवार, २१ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सात वाजता 'शिवाजी अंडरग्राउंड इन भीमनगर मोहल्ला' या नाटकाच्या प्रयोगाने संमेलनाला सुरुवात झाली.

शनिवारी, २२ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता औरंगपुरा येथे महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याला अभिवादन करून सांस्कृतिक विचारयात्रा निघाली. सकाळी दहा वाजता हिंदी साहित्यिक कंवल भारती यांच्या हस्ते संविधान मंचावर संमेलनाचे उद्घाटन झाले. यावेळी संमेलनाध्यक्ष डॉ. अशोक राणा, मावळते संमेलनाध्यक्ष डॉ. वासुदेव मुलाटे, उर्दू साहित्यिक नुरुल हस्नैन, स्वागताध्यक्ष सतीश चकोर, मुख्य निमंत्रक धनंजय बोरडे आणि प्रा. प्रतिमा परदेशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना संमेलनाचे उद्घाटक हिंदी साहित्यिक कंवल भारती म्हणाले, संमेलनाच्या निमित्ताने आज मी पहिल्यांदाच या शहरात आलोय. एवढ्या मोठ्या प्रमाणात विद्रोहींचा मेळावा मी आज पहिल्यांदाच पाहिलाय. एवढा उत्साह पाहून मी खरोखर कृतार्थ झालो आहे. संभाजीनगरवासियांचा साहित्याकडे असलेला ओढा, प्रेम पाहून मला भरून आले आहे. विद्रोहाकडे आपण जात आहोत. ते एक मोठ्या क्रांतीचे प्रतीक आहे.

संमेलनाध्यक्ष डॉ. अशोक राणा म्हणाले, यावेळी अध्यक्ष पद मला मिळालं याचा मला खूप आनंद होतोय. विद्रोही सांस्कृतिक चळवळ काही वर्षांपासून फार मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रभर वेगाने पुढे जात आहे. आणि जे शहर संमेलनासाठी निवडलय ते चळवळीचे शहर आहे. येथील नामांतर आंदोलनांनी पूर्ण महाराष्ट्राला आणि भारताला एक दिशा दिलेली आहे. या ठिकाणी अजिंठा-वेरूळ सारख्या लेण्या आहेत. ज्या ठिकाणी बौद्ध, जैन, शैव दोन्ही संप्रदायाचे मिलन आहे. विशेषतः महाराष्ट्राचा किंवा भारताचा आद्य राजवंश सातवाहन यांचा हा जिल्हा आहे. एका इतिहास संशोधकाला याठिकाणी संधी मिळाली हा माझ्यासाठी एक आनंदाचा क्षण आहे. आपल्या स्वभावात विद्रोह तर आहेच तो चालूच राहणार आहे. सर्व विद्रोहींना मी या ठिकाणी सदिच्छा देतो.

विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या राज्याध्यक्ष प्रतिमा परदेशी म्हणाल्या, आदिवासी कलावंत, सर्वच कष्टकरी विचारवंत कार्यकर्ते साहित्य संमेलनामध्ये सहभागी झालेले आहेत. हे १९व्या मराठी साहित्य संमेलन संविधान मूल्यांना आम्ही समर्पित केलेले आहे. संविधानाचा अमृत महोत्सवी वर्ष आहे. आमच्यासाठी हा आनंदाचा भाग आहे. एकीकडे संविधानाचे मारेकरी वाढत असताना हे संविधान जनतेपर्यंत पोहचवण्याची विद्रोही म्हणून आमची जबाबदारी आहे. आणि म्हणून हे संविधान मूल्यांना आणि सत्यशोधक समाजाचे १५१ वे वर्ष आहे. याला हे संमेलन आम्ही समर्पित केलेलं आहे. तुकाराम महाराजांच्या मार्गाने आम्ही निघालो आहोत.

पुढे बोलताना प्रतिमा परदेशी म्हणाल्या, बाहेर बहुमताची भलतीच चर्चा चाललेली आहे. पण तुकोबारायांनी "सत्य असत्याशी मन केले ग्वाही, मानियले नाही बहुमता, या विचारांनी आम्ही पुढे जात आहोत. सत्य हे सिद्ध होईपर्यंत आम्ही आमचा संघर्ष चालूच ठेवणार आहोत.

सरकारला अजून दाभोळकर, पानसरे यांचे मारेकरी सापडत नाही. सरकारचा सत्ताधारी वर्गाचा हा नाकर्तेपणा आहे. त्यांना टीनपाट सुपारी पंटर पण लोक सापडतात पण खुनाचे मानेकरी सापडत नाही. हा विचारांचा संघर्ष आम्ही मानतो. दुसऱ्या कोणाचा खून वगैरे झाला तर त्यांचे कदाचित त्यांना पटकन मारेकरी सापडले असते. पण हे समतावाद पेरणारी माणसं अंधश्रद्धेच्या विरोधात बोलणारी माणसं जातीयंता बद्दल बोलणारी माणसं त्यांचे खून होतात. गौरी लंकेश सारख्या पत्रकाराचा म्हणजे माध्यमांचा आवाज एका अर्थानं मारून टाकण्याचा कृती होती त्याचा विद्रोहीने सातत्याने निषेध केलेला आहे. आणि आम्ही त्यांच्या विचारांचा जागर निश्चितपणे करणार आहोत.

दिल्लीतलं साहित्य संमेलनाविषयी बोलताना परदेशी म्हणाल्या, खरं तर आम्हाला घाबरून ते पळून गेलेले आहेत. कारण मागच्या ५ संमेलनात त्यांचा पराभव झाला. खुर्च्या रिकाम्या होत्या. हे तुम्हीच माध्यमातून दाखवलेलं आहे. आणि ते देशाच्या राजधानीत आहेत पण आम्ही मराठवाड्याच्या राजधानीमध्ये या मराठी भूमीमध्ये मराठी साहित्य संस्कृतीचा झेंडा घेऊन ठामपणे उभे आहोत. तिथे सरकारचे महामोर पैसे आहेत पण इथे जनतेचा आवाज आहे. आमचं संमेलन त्यामुळे महाप्रवाह हे झालेलं आहे. महात्मा फुले यांनी जे स्वप्न पाहिलं होतं की १९ व्या शतकात आमचे ग्रंथकार आमच्या सभा भरवतील. ते विद्रोहीने सत्यात उतरवलं आहे. याचा आज आनंद होतो.































# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २३ फेब्रुवारी २०२५

# कॉपीमुक्ती अभियान, अधिकाऱ्यांची चंगळ, हाक ना बोंब

महाराष्ट्रात गेल्या एक महिन्यापासून राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे साहेब यांनी कॉपीमुक्तीसाठी जंग जंग पछाडले अगदी दादा भुसे पासून ते शाळेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यापर्यंत सर्वांनी कॉपीमुक्तीचा मनापासून नारा दिला. सर्व अधिकाऱ्यांनी शिक्षण विभागातील अधिकारी महसूल विभागातील अधिकारी जे जे त्यांच्याशी संबंधित आहेत त्या सर्व अधिकाऱ्यांनी कॉपीमुक्त परीक्षा व्हाव्यात यासाठी प्रचंड मेहनत घेतली.

त्याची जाहिरात बाजी पण मोठ्या प्रमाणावर झाली अखेर ११ फेब्रुवारी २०२५ ला बारावीची परीक्षा सुरू झाली आणि २१ फेब्रुवारी २०२५ ला दहावीची परीक्षा सुरू झाली खरा प्रश्न हा आहे खरंच परीक्षा कॉपीमुक्त चालू आहेत का??परीक्षा कॉपीमुक्त व्हाव्यात यासाठी शिक्षण विभागाने अनेक भरारी पथक नेमली आहे तसेच महसूल विभागाने सुद्धा अनेक भरारी पथक नेमली आहेत.

ग्राउंड लेव्हलचा अनुभव असा आहे की शिक्षण विभागाची जी पथका येतात विशेषता जे अधिकारी येतात त्यातील बहुतांश अधिकारी एखाद्या शाळांमध्ये किंवा परीक्षा केंद्रामध्ये एक-दोन विद्यार्थ्यांचे उत्तर पत्रिका कॉपी म्हणून पकडतात आणि त्याचा कुठल्या कोणत्याही प्रकारचा कॉपी केस न करता सौदेबाजी करतात यात शिक्षण विभागातील अनेक उच्च सदस्य अधिकारी आहेत. आज इयत्ता दहावीचा मराठीचा पेपर झाला छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील उच्च पदस्य अधिकारी एका शाळेमध्ये सहा विद्यार्थ्यांना कॉपी केस प्रकरणांमध्ये अडकवले पण त्यांच्यावर कुठली कारवाई न करता सॉरी भाजी केली सहा विद्यार्थ्यांचे कॉपी केस न करण्यासाठी ५० हजार रुपयाची मागणी केली. बराच वेळ सौदेबाजी झाल्यानंतर पन्नास हजार वरून सदर अधिकारी ३० हजारामध्ये मान्य झाल्या.

छत्रपती संभाजी नगर मधील एका दुर्गम तालुक्यात शिक्षण विभागातील एका अधिकाऱ्याने एकाच दिवसात एक लाख पन्नास हजार रुपये कमावले. एका एका उच्च माध्यमिक विद्यालयाला भेट दिली. तिथं ५० हजार रुपयांमध्ये सौदा पक्का झाला. दुसऱ्या एका महाविद्यालयाला भेट दिली तिथे मागणी एक लाखाची केली पण सौदा मात्र ५०००० पूर्ण झाला. त्याच उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये सौदा पूर्ण होऊन निघत असताना विद्यार्थ्यांनी म्हणजेच परीक्षार्थी त्यांच्याच अंगावर कॉफी फेकला. याचा यांना प्रचंड राग आला आणि रागाच्या भरात त्या परीक्षा हॉलमधील पर्यवेक्षक ज्यांची काही सुद्धा चुकी नाही त्यांना जाग्यावर निलंबित करण्यासाठी सदर अधिकाऱ्यांनी भाया सरसावल्या.

पण सदर परीक्षा हॉलमधील पर्यवेक्षकांनी गयावया केल्यानंतर त्यांना शिक्षा मिळावी आणि ती कायम लक्षात राहील यासाठी निलंबित करणे ऐवजी एक लाख रुपयांची मागणी केली चर्चेअंती हा हा सौदा ५०००० रुपयांमध्ये फायनल झाला आणि एकाच दिवशी एक लाख ५० हजार रुपये कोणत्याही प्रकारची नोंद नसलेली कसल्याही प्रकारचा कर भरता त्यांच्या खिशात जाऊन विराजमान झाले.

खाजगी चर्चेमध्ये असा अंदाज आहे की हे अधिकारी दहावी आणि बारावीच्या संपूर्ण परीक्षेच्या कालावधीमध्ये किमान २५ ते ३० लाख रुपये कमावतील आणि यांनी खास छत्रपती संभाजी नगर मध्ये बदली करून घेण्यासाठी ४० लाख रुपये दिले ते वसूल करण्याचं टार्गेट या दोन परीक्षेमध्ये आहेहे फक्त उदाहरणादाखल आहे पण शिक्षण विभागातील अधिकारी सर्रासपणे अशा प्रकारची सौदेबाजी करतात आणि परीक्षा केंद्र चालवणारे केंद्र संचालक असो संस्थाचालक असो किंवा काही भागांमध्ये पालक त्यांच्या या सौद्याला मान्यता देतात केंद्राला भेट दिल्यानंतर शिक्षण विभागातील अधिकारी खाली हात कधीही परतत नाहीत त्यांचा यामध्ये अनेक बाजूंनी फायदा होतो ते आपले कर्तव्य पूर्ण करतात त्यांचा आर्थिक फायदा पण होतो यामध्ये अडचण अशी आहे की जे केंद्रावर ते जातात त्या केंद्रामध्ये यावर्षीपासून जर त्या केंद्रावर कॉपी केस पकडले गेले तर पुढच्या वर्षीपासून त्या केंद्रामध्ये पुन्हा परीक्षा केंद्र देणार देण्यात येणार नाही या भीतीपोटी त्या केंद्रावरील लोक ही सौदेबाजी करतात आणि ही सौदेबाजी सध्या सर्रासपणे चालू आहे.

केंद्रात काम करणारे किंवा परीक्षा केंद्राशी संबंधित असणारे लोक या विषयी उघडपणे कुठेही तक्रार करत नाहीत पण खाजगी मध्ये कोणत्या अधिकाऱ्याने किती पैसे घेतले आणि यांनी त्यांना कसं मॅनेज केलं याचे किस्से चविष्टपणे चर्च केले जातात. याविषयीची चर्चा किंवा या विषयाची तक्रार ते रीतसर पर्यंत देऊ शकत नाहीत कारण त्यांनी सुद्धा विद्यार्थ्यांकडून काही प्रमाणामध्ये रक्कम वसूल केलेली असते म्हणजेच छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यामध्ये असे अनेक दहावी-बारावीचे परीक्षा केंद्र आहेत ज्या परीक्षा केंद्रामध्ये नाशिक मुंबई पुणे ठाणे या भागातून ॲडमिशन घेणारे विद्यार्थी असतात तसेच असे बरेचसे महाविद्यालय आहेत की ज्या महाविद्यालयामध्ये एका सुद्धा प्राध्यापकाची कायमस्वरूपी नेमणूक नाही. तरीसुद्धा या महाविद्यालयामध्ये हजारो विद्यार्थ्यांचे ॲडमिशन असतात अशा उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये विद्यार्थी अकरावी बारावी या दोन वर्षांमध्ये कधीही फिरकलेला नसतो कोणत्याही प्रकारची तासिका त्याची झालेली नसते त्याला विषय कोणतेही हॉल तिकीट आल्यानंतर हॉल तिकीट आल्यानंतर कळलेले असतात तरीसुद्धा असे विद्यार्थी भरघोस गुणांनी उत्तीर्ण होतात मग अशा विद्यार्थ्यांकडून परीक्षा केंद्रामध्ये भरघोस प्रमाणामध्ये रक्कम लाटलेली असते अशी परीक्षा केंद्र करोडो मध्ये रक्कम विद्यार्थ्यांकडून जमा करतात आणि अधिकाऱ्यांमध्ये म्हणजे दर दिवशी परीक्षा चालू असताना भेट देणाऱ्या अधिकाऱ्यांमध्ये ती हजाराच्या प्रमाणात वाटत असतं त्यामुळे अशा प्रकरणांमध्ये तेरी भी चूप मेरी भी चुप म्हणजे हाक ना बोंब पैसे देणारा कधी काही बोलत नाही काही तक्रार करत नाही पैसे घेणारा बिन बोबट पैसे घेत असतो.

या अशा प्रकारामुळे खरी अडचण होते ती जे शिक्षक कायमस्वरूपी नोकरीला आहेत आपल्या विद्यार्थ्यांना दहावीचे असो किंवा बारावीचे असो प्रामाणिकपणे वर्षभर शिकवतात प्रामाणिकपणे वर्षभर त्यांना सर्व गोष्टी सर्व अभ्यासक्रम पूर्ण करतात अशा महाविद्यालयांमध्ये अशा शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे प्रमाण अत्यल्प झालेली आहे आणि ज्या विद्यालयात किंवा उच्च माध्यमिक विद्यालय उत्तीर्ण होण्याची हमी घेतली जाते भरघोस गुण देण्याची हमी घेतली जाते अशा परीक्षा केंद्रावर अशा भागामध्ये मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी प्रविष्ट होत असतात अशा भानगडीमुळे अशा गोष्टीमुळे प्रामाणिक विद्यार्थ्यांचा परीक्षार्थीचा आणि प्रामाणिक शिक्षक यांची कुचंबना होत असते फक्त छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्याबाबत विचार केला तर हा सर्व व्यवहार म्हणजे विद्यार्थ्यांकडून पैसे जमा करणे आणि ते त्यांच्या स्ट्रीक होल्डरला वाटप करणे दरवर्षी परीक्षेच्या काळामध्ये ही रक्कम जाते जवळपास दहाकोटीच्या आसपास यामध्ये भरारी पथकात असणारे अधिकारी पण मालामाल होतात संस्थाचालक पण मालामाल होतात परीक्षा केंद्रावर काम करणारे सुद्धा मालामाल होतात पण या विरुद्ध कसल्याही प्रकारची तक्रार कुठेही केली जात नाही पण या सर्व बाबी विद्यार्थ्यांचं शिकणं मात्र राहून जात आहे आणि समाजामध्ये शिक्षणाबद्दल आणि व्यवस्थेबद्दल अनास्था निर्माण करण्याचं काम होत आहे.

**भाई चंद्रकांत चव्हाण**
मराठवाडा शिक्षक संघ

# पाटील गुरुजींच्या मळयात हुरडा पार्टीचा लुटला रोटरी सदस्यांनी आनंद.....




बिराजदार वस्ती, ता. उमरगा कलाप्पा पाटील यांच्या मळयात रोटरीच्या सदस्यांनी हुरडा पार्टीचा आनंद घेताना......

**मुरूम, ता. उमरगा, (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : हुरडा पार्टी एक अनोखा व पारंपारिक ग्रामीण भागातील हिवाळ्यातील विशेषतः जानेवारी-फेब्रुवारी महिन्यात साजरा केला जातो. हा एक आगळा-वेगळा खाद्यसंस्कृतीचा उत्सव मानला जातो.

ताज्या-कोवळ्या ज्वारीच्या कणसांना उष्ण राखेत भाजून हाताने रगडून काढलेल्या गरम दाण्यांचा हुरडा म्हणजे हुरडा पार्टी होय. बिराजदार वस्ती, ता. उमरगा येथील रोटरीयन कलाप्पा पाटील गुरुजी यांच्या शेतातील मळयात शनिवारी (ता. 21) रोजी ताज्या ज्वारीच्या कुरकुरीत आणि चवदार दाणेदार हुरडा, शुद्ध निसर्गरम्य ग्रामीण वातावरणातील आनंददायी मेजवानीची पर्वणीच होती. गूळ, पेंडखजूर, खारे शेंगदाणे, चिवडा, मीठ, चटणीसोबत कवळ्या दाणेदार चविष्ट हुरड्याचा आस्वाद मुरूम रोटरीच्या सदस्यांनी घेतला. याप्रसंगी रोटरी क्लब मुरूम सिटीचे अध्यक्ष कमलाकर मोटे, रोटरीचे माजी अध्यक्ष डॉ. नितीन डागा, प्रा. डॉ. महेश मोटे, प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, संतोष कांबळे, उपप्राचार्य कलाप्पा स्वामी, प्रकाश रोडगे, शिवकुमार स्वामी, प्रा. भूषण पाताळे, मल्लिनाथ बदोले आदींनी हिवाळा स्पेशल हुरडा पार्टीचा आनंद लुटला.

शेतसंध्येप्रसंगी ढाळे, गावाकडच्या मातीचा सुगंध, गावरान उसाचा रस, हुरडा पार्टी ही केवळ खाण्याचा आनंद घेण्याची संधी नसून, ग्रामीण संस्कृतीशी जोडले जाण्याचा एक खास आनंद उत्सव आहे. ओम मुळे, नरसप्पा पाटील, साई मुळे, मल्लिनाथ पाटील, महादेव मुळे आदींनी पुढाकार घेऊन स्पेशल हुरडा पार्टीचे नियोजन केले.

शेवटी हुरडा पार्टीचा समारोप करताना कलाप्पा पाटील यांनी हुरडा पार्टी......थंडीच्या या गार वाऱ्यात,मैत्रीचा रंग फुलला खास, शेतामधल्या हिरव्या गाली,हुरड्याचा दरवळला सुवास !धगधगत्या या निखाऱ्यावर,हुरडा झाला भाजून गडद,चटणी, लसणीची चव खमंग,गरम हुरड्याचा गोड स्वाद !उसाच्या रसाची गोड सरिता,भाकरीचा तो खरपूस तुकडा,खेड्याच्या माळरानावरती,धमाल आली गप्पांची नुकती !संगती असता स्नेहभाव,हुरडा पार्टी रंगत जाते,निसर्गाच्या कुशीत सारे,आठवणींचे मोती लुटते !या कवितेतून आपल्या भावना याप्रसंगी व्यक्त केल्या.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २३ फेब्रुवारी २०२५

# फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलची ९५ वी वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न

## शिवाजी महाराजांच्या ३९५ व्या जयंती निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या ३९५ कलमी "भारताचे संविधान" याची अंमलबजावणी करणे हेच खरे अभिवादन होय : बी. बी. मेश्राम







**छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी)** : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) यांच्या संयुक्त विद्यमाने फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जनसंपर्क कार्यालय, साकेत नगर, छत्रपती संभाजी नगर येथे कुळवाडी भुषण बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त 'बहुजन प्रतिपालक कुळवाडी भुषण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या साम्राज्यातील रयतेचे राज्य' या विषयावर ९५ वी वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा १९ फेब्रुवारी २०२५ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी.बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, शिवजयंतीची सुरूवात राष्ट्रपिता ज्योतिबा फुले यांनी केली असल्याने त्यांचे स्मरण करणे प्रासंगिक आहे. शिवसैनिकांनी शिवाजी महाराजांच्या नांवाचा वापर करताना धार्मिक द्वेष पसरविण्यापेक्षा प्रबोधनकार ठाकरे यांच्या विचारांना गतिमान केले तर शिवाजी महाराजांना अभिवादन केल्यासारखे होईल. शिवाजी महाराजांनी वापरलेला गनिमी कावा वर्तमानात कसे उपयोगात आणले जाऊ शकेल? याचाही विचार केला पाहिजे. प्रवीण सूर्यवंशी व संतोष देशमुख यांना न्याय प्रदान करण्यासाठी दुटप्पी भूमिका पार पाडणा-यांपासून जनतेने सावध राहीले पाहिजे.

प्रत्येक प्रतिनिधींचे प्रस्तुतीकरण समतेसाठी महत्त्वाचे असल्यामुळे आपण सर्वांना व्यक्त होण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. जेणेकरून आज दोन मिनिटे बोलणारी व्यक्ती वर्षभरांनी वीस मिनिटे बोलायला लागेल. आपले म्हणणे प्रस्तुत करता येत नाही म्हणून न्यायालयीन लढाई जिंकण्यासाठी वकिलांची नेमणूक करावी लागते. ही वास्तविकता असली तरी डॉ. शिवशंकर दास व डॉ. क्षिप्रा उके यांनी त्यांच्या वर झालेल्या अन्यायाच्या विरोधात दाखल केलेल्या फिर्यादीची बाजू वकील न लावता स्वतः युक्तीवाद प्रस्तुत करून १२७ कोटीच्या इंटिलेक्च्युअल प्रा◌ॅपर्टीचा दावा जिंकल्याचे ऐकिवात आहे. यावरून आपली बाजू पटवून देण्यासाठी बोलण्याची किती आवश्यकता आहे? हे सिद्ध होते. म्हणून शिवाजी महाराज हे रयतेचे राजे कसे होते? हे आपण संदर्भासहीत प्रस्तुत केले पाहिजे. तसेच आज कुळवाडी भुषण बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ व्या जयंती निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या "भारताचे संविधान" यातील ३९५ कलमांची रयतेला न्याय देण्यासाठी काटेकोरपणे अंमलबजावणी करू शकलो तर हीच त्यांना खरी सार्थक आदरांजली, अभिवादन ठरेल. म्हणून आपण त्यासाठी प्रयत्नशील असावे.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना सुभाष ठोकळ म्हणाले की, शिवाजी महाराजांचा जाज्वल्य इतिहास जाणून घेतला तर त्यांनी केलेले कार्य आणि लिहिलेला इतिहास यात बरीच तफावत पहायला मिळत आहे. दुस-यांच्या आनंदासाठी आपल्या सुखावर विरजण घालणारी माणसे विरळच असतात. जे असे करतात त्याना महापुरुष म्हटले जाते. जेव्हा समाजात अन्याय, अत्याचार होतात तेव्हा फुले शाहू आंबेडकरासह इतरही महापुरुषांची आठवण समाजाला होत असते. तुमच्या आमच्या मताची किंमत मिठ, मिरची, भाजी, भाकरी एवढीच नाही हे ज्यांना कळले त्यांनी इतरांना समजावून सांगितले पाहिजे. या लोकशाहीत साधनांचे झालेले विषम वाटप बदलून समतेत परावर्तित करून मानवतावाद स्थापित केला पाहिजे.

याप्रसंगी प्रमुख वक्ते प्रा. डॉ. रामचंद्र काळुंखे मार्गदर्शन करताना म्हणाले की, एखादे पुस्तक वाचण्यापूर्वी व वाचनानंतर वाचणा-यात बदल होत नसेल तर ते पुस्तक टाकाऊ समजले पाहिजे. परिवर्तनवाद्यांनी व्यवस्थेचा भाग बनन्याऐवजी व्यवस्थेच्या बाहेरील परिघाचा चिकित्सकतेने विचार केला पाहिजे. महात्मा फुले यांच्या दृष्टीकोनातून शिवाजी महाराजांचे कार्य रयते साठी कशाप्रकारे कार्यरत होते? याचा विचार केला पाहिजे. शिवाजी महाराजांनी जनतेकडून बळजबरीने कर वसूल करू नये असा आदेश दिला होता. यावरून ते खरे रयतेचे राजे होते.

याप्रसंगी उद्योजक मिलिंद बागूल म्हणाले की, कोणत्याही कार्यास पुढे नेण्यासाठी प्रशिक्षित असणे आवश्यक आहे. इंजिनिअर किशोर पाटील म्हणाले की, महिला अंधश्रद्धेच्या वाहक असल्याने कुटुंबात बदल होत नाही. याला पुरुष मंडळी बळी पडतात. आपल्या घरात रमाई, सावित्री, जिजाऊ सारख्या कर्तृत्ववान महिला नसल्याने दुरावस्था होत आहे. शिवाजी महाराज गद्दारांना माफ करीत नव्हते. राहुल पाटील म्हणाले की, स्वराज्य आणि संविधान या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. प्रमोद डोंगरे म्हणाले की, आपण एवढे आंधळे आहोत की, अन्याय अत्याचार करणाऱ्यांकडेच न्यायासाठी याचना करीत आहोत. नवीन पिढीत ऊर्जा भरायला हवी. टी. एन. थोरात म्हणाले की, शिवाजी महाराजांवर तथागत बुद्ध विचारांचा प्रभाव होता ज्यामुळे त्यांनी रयतेच्या कल्याणासाठी राज्य केले म्हणून त्यांना रयतेचे राजे असे म्हणतात. अशोक मेश्राम म्हणाले की, महापुरुषांना जाती जातीत विभागून चालणार नाही.

सुरुवातीला स्टडी सर्कलच्या वतीने मान्यवरांचे शाब्दिक स्वागत करण्यात आले. कार्यशाळेचे सुत्रसंचालन व प्रास्ताविक एड. विलास रामटेके यांनी व्यक्त केले. यावेळी टी. एन. थोरात यांनी दोनच राजे इथे गाजले कोकण पुण्यभूमी वर एक त्या रायगडावर व एक त्या चवदार तळ्यावर हे गीत सादर केले. या कार्यशाळेला उद्योजक मिलिंद बागूल, इंजिनिअर किशोर पाटील, टी. एन. थोरात, प्रा. डॉ. रामचंद्र काळुंखे, राहूल पाटील, प्रमोद डोंगरे, नरेश तिरपुडे, सुभाष ठोकळ, अशोक मेश्राम, साधू आनंद, एड. डी. बी. मेश्राम, भिमराव मुजमुले, एड. विलास रामटेके, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने कार्यशाळा हर्षोल्हासात संपन्न झाली.

**शब्दांकन : बी. बी. मेश्राम,**
संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र.संपर्क : ९४२१६७८६२८stdbbm@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002